सकाळ
www.agrowon.com
www.epaper.agrowon.com
# ॲग्रोवन
मित्र ग्लोबल शिवाराचा..
पुणे शुक्रवार, ५ जानेवारी २०१८ । पाने १६ । किंमत ₹ ३ ।
पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून प्रसिद्ध


# बीटी बियाणे न विकण्याचा बियाणे कंपन्यांचा इशारा

## मोन्सॅन्टोने बोंड अळीप्रश्‍नी जबाबदारी स्वीकारण्याची मागणी

विनोद इंगोले

नागपूर : बीजी-२ तंत्रज्ञानाप्रती गुलाबी बोंड अळीमध्ये प्रतिकारशक्ती निर्माण झाली. परिणामी महाराष्ट्रात बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढला. यासंदर्भाने उद्‌भविलेल्या परिस्थितीची जबाबदारी पूर्णपणे मोन्सॅन्टोने न स्वीकारल्यास येत्या हंगामात बियाणे कंपन्या बीटी वाणांची विक्री करणार नाहीत, असा इशारा नॅशनल सीड असोसिएशनने महिको-मोन्सॅन्टोला दिला आहे. जानेवारी २०१८ पासूनच या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. त्यानंतर देशात बियाणे टंचाई उद्‌भविल्यास त्यालाही मोन्सॅन्टोच जबाबदार राहील, असेही असोसिएशनच्या पत्रात म्हटले आहे.

पान ४ वर ▸



नॅशनल सीड असोसिएशनने दिलेले पत्र ▸

### दृष्टिक्षेपात

- ४९ रुपये प्रति पाकीट रॉयल्टी मोन्सॅन्टोकडून आकारली जाते.
- यातील एक रुपयाही डीलर किंवा बियाणे कंपन्यांना मिळत नाही.
- परिणामी तंत्रज्ञानाच्या अपयशाला मोन्सॅन्टोच जबाबदार- कंपन्यांचा दावा.
- परंतु मोन्सॅन्टो यातील कोणतीही जबाबदारी उचलण्यास तयार नाही.
- जानेवारी २०१८ पासून बियाणे कंपन्या बीटी वाण विकणार नाही.
- देशात बियाणे तुटवडा निर्माण झाल्यास मोन्सॅन्टोची जबाबदारी.

नॅशनल सीड असोसिएशनचे कार्यकारी संचालक डॉ. कल्याण गोस्वामी यांनी हे पत्र दिले आहे; त्यानुसार बोलगार्ड-२ तंत्रज्ञान गुलाबी बोंड अळीला बळी पडत असल्याचा अहवाल केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने २०१५ मध्येच दिला होता. त्याची दखल घेत १९ सप्टेंबर २०१५ आणि २५ ऑक्टोबर २०१७ या तारखांना केंद्रीय कृषी मंत्रालयाने या विषयावर बैठकादेखील घेतल्या. या दोन्ही बैठकांच्या इतिवृत्तातदेखील बीजी-२ तंत्रज्ञान गुलाबी बोंड अळीला बळी पडत असल्याचे स्पष्टपणे नमूद आहे.

# ‘आयात’बंदीच तारेल साखर उद्योगाला

## केंद्राच्या ढिम्मपणाचा कारखानदारांना फटका

राजकुमार चौगुले

कोल्हापूर : साखरेच्या दरात वाढ होण्यासाठी केवळ निर्यात अनुदानच न देता बाहेरून येणाऱ्या साखरेला पूर्णपणे आयातबंदी केली तरच कोसळणारे साखरेचे दर स्थिर राहून या साखर उद्योगाला दिलासा मिळणे शक्य आहे. गेल्या काही वर्षांतील केंद्राचा अनुभव पहाता आतापासूनच प्रयत्न केल्यास त्याचा लाभ कुठेतरी पुढच्या हंगामात होऊ शकेल या निष्कर्षापर्यंत या उद्योगातील घटक आले आहेत. यादृष्टीनेच केंद्रातील महत्त्वाच्या व्यक्तींना भेटून सद्यःस्थिती सांगण्याचे काम वेगाने सुरू झाले आहे.

**फिलिपिन्स, इराणसारखी तत्परता महत्त्वाची**

यंदाच्या हंगामात तातडीने साखर निर्यात हाणे अशक्य असले तरी किमान पुढील हंगामात तरी आश्‍वासक निर्णय व्हावेत यासाठी शेतकरी संघटनांबरोबर साखर कारखानदार व साखर महासंघाच्या वतीनेही याबाबत आतापासूनच प्रयत्न केले जात आहेत. जागतिक बाजारात साखरचे दर घसरल्यानंतर फिलिपिन्स व इराणने तातडीने निर्णय घेऊन या उद्योगाच्या ऊर्जितावस्थेसाठी प्रयत्न केले.

पान ४ वर ▸

Sakal Media Group
Print | TV | Digital | Events

SAVE SOIL SAVE INDIA
ग्रीन हार्वेस्ट
नेचर केअर फर्टीलायझर्स
प्रस्तुत

agrowon Events & Exhibitions

ज्ञानातून विकासाकडे आणि
आधुनिकतेतून समृद्धीकडे नेणारे दर्जेदार कृषी प्रदर्शन

आजपासून शुभारंभ

ॲग्रोवन कृषी प्रदर्शन २०१८

सांगली

ता. ५ ते ७ जानेवारी २०१८, वेळ : स. १० ते ७
स्थळ - कल्पद्रुम मैदान, नेमिनाथनगर, विश्रामबाग, सांगली

प्रदर्शनाला अवश्य भेट द्या

सहप्रायोजक
Chitale Genus ABS (India) Private Limited



एक झकास कृषी प्रदर्शन

कृषी प्रदर्शन चर्चासत्र वेळापत्रक

| वार व तारीख | वेळ | वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| शुक्रवार (ता. ५) | दुपारी १२ ते २ | श्री. गुणवंत गरड (प्रगतशील शेतकरी व निर्यातक्षम डाळिंब तज्ज्ञ, पंढरपूर) श्री. राजाराम यलपल्ले-पाटील (प्रगतशील शेतकरी, आजनाळे, सांगोला) | फळबाग लागवड व निर्यातक्षम डाळिंब उत्पादन तंत्रज्ञान |
| | दुपारी ३ ते ५ | श्री. निलेश मालेकर, वरिष्ठ शास्त्रज्ञ, कल्याणी गोरक्षण ट्रस्ट संचालित कृषी विज्ञान केंद्र, कालवडे (कऱ्हाड) | पीकवाढीचे तंत्र आणि मंत्र |
| शनिवार (ता. ६) | दुपारी १२ ते २ | श्री. सुरेश माने-पाटील माजी शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी पुणे | भरघोस उत्पन्नवाढीसाठी ऊस पिकाचे व्यवस्थापन |
| | दुपारी ३ ते ५ | श्री. मनोज वेताळ, उपविभागीय कृषी अधिकारी, मिरज | शेतीच्या शासकीय योजना |

शेतकऱ्यांसाठी माहितीचा खजिना
आधुनिकतेकडे नेणाऱ्या तंत्रज्ञानाचा आविष्कार
कृषी क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग
परिसंवादाच्या दालनात नामवंत तज्ज्ञांचे, प्रगतशील शेतकऱ्यांचे दररोज मार्गदर्शन

Website - www.corporate.agrowon.com II www.agrowon.com II www.facebook.com/agrowon, Email - event.agrowon@esakal.com